## जाहिरातीचा प्रारूप नमुना

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे ४११००१**

फोन नं. (०२०) २६०५०६४१ Email.Id – sceapune @gmail.com

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे मध्ये सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी/ अधिकारी यांच्यामधून (वयाच्या ६५ वर्षापर्यंत) कंत्राटी पध्दतीने "सह सहकारी निवडणूक आयुक्त", "सहाय्यक सहकारी निवडणूक आयुक्त", "लेखा अधिकारी तथा रोखलेखापाल" व "सहाय्यक प्रशासकीय अधिकारी" प्रत्येकी १ पद अशी एकूण ४ पद भरण्यासाठी जाहिरात देण्यात येत आहे. यासोबत कंत्राटी पद भरतीची जाहीरात, सदर जाहीरातीच्या अटी व शर्ती, विहीत नमुना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म. रा. पुणे यांचे व www.sahakarayukta.maharashtra.gov.in व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे https://scea.maharashtra.gov.in या संकतेस्थळावर अपलोड केलेला आहे. तरी सर्व विभागातील सेवानिवृत्त इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांनी दिनांक २८.०७.२०२६ पर्यंत सदरचे अर्ज प्राधिकरणाच्या उपरोक्त पत्यावर पोस्टाद्वारे अथवा प्रत्यक्ष अथवा sceapune@gmail.com या ईमेल वर सादर करावेत. तसेच सदर अर्ज प्राधिकरणाच्या कार्यालयातही उपलब्ध आहेत.

सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

## कंत्राटी पद भरतीची जाहिरात

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१**

फोन नं - (०२०) २६०५०६४१ Email id :- sceapune@gmail.com

---

दिनांक ३०/०३/२०१३ च्या अधिसुचनेव्दारे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे या स्वतंत्र व स्वायत्त प्राधिकरणाची पुणे येथे स्थापना करण्यात आली असून प्राधिकरणात कंत्राटी पध्दतीने भरती करण्यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा कडील, निर्णय क्रमांक : संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील तरतुदी नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही विभागातील संबंधीत वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | पदभरतीच्या माध्यमासाठी अर्जदार ज्या वेतनश्रेणीतुन सेवानिवृत्त झाला असेल त्या श्रेणीचा तपशिल/ पात्रता | अनुज्ञेय पारिश्रामिक |
|---|---|---|---|---|
| १. | सह सहकारी निवडणूक आयुक्त | १ | (एस २३) ६७७०० - २०८७०० | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं. संकीर्ण-२७१५/ प्रक्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ चे शासन निर्णयातील परिशिष्ट अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पारिश्रमिक देय राहील. |
| २ | सहाय्यक सहकारी निवडणूक आयुक्त | १ | (एस १५) ४१८०० - १३२३०० | |
| ३ | लेखा अधिकारी तथा रोखलेखापाल | १ | (एस १५) ४१८०० - १३२३०० | |
| ४ | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | १ | (एस १४) ३८६०० - १२२८०० | |

विस्तृत जाहिरात, अर्जाचा विहीत नमुना, अटी व शर्ती मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचे http://sahakarayukta.majarashtra.gov.in व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या https://scea.maharashtra.gov.in या वेबसाईट वर देण्यात आला आहे. अर्ज सादर करण्याचा कालावधी **दिनांक १३.०७.२०२६ ते दि.२८.०७.२०२६** पर्यंत राहील. तसेच सदर अर्ज प्राधिकरणाच्या कार्यालयातही उपलब्ध आहेत.

सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**अटी व शर्ती** -

१. अर्जदारांनी त्यांचे अर्ज मा. सहकार आयुक्त पुणे यांच्या http://sahakarayukta.maharashtra.gov.in व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या https://scea.maharashtra.gov.in या वेबसाईट वरून विहित नमुना अर्ज डाउनलोड (dowan load) करून घेऊन ते सदस्य सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे ४११००१ या पत्त्यावर पाठवावेत किंवा प्राधिकरणाच्या sceapune@gmail.com या ई-मेल वर किंवा पोस्टाने/ प्रत्यक्ष कार्यालयात सादर करावेत.

२. अर्जदारांनी अर्जात त्यांची जन्मतारीख, सेवानिवृत्तीची तारीख, सेवानिवृत्ती वेतनाचे प्रदान आदेशाची Pension Payment Order (PPO) छायांकित सत्य प्रत, पत्रव्यवहाराचा पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी क्रमांक इत्यादी बाबी ठळक व अचुक नमुद कराव्यात.

३. (i) उपरोक्त पदाच्या बाबतीत प्रस्तावित वेतनश्रेणीतून किमान ३ वर्षाचा अनुभव अथवा विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता असणाऱ्या आणि शासनाच्या कोणत्याही विभागातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांनी आवेदन पत्र सादर करावे.

(ii) शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले मात्र वयाची 65 वर्ष पुर्ण न झालेले अधिकारी/कर्मचारी करार पध्दतीने नियुक्ती करण्यास पात्र असतील मात्र नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती या वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.

(iii) **करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा** :- सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतु अशा नियुक्तीस गुणवत्ता मुल्य निर्धारण अहवाल / निकषावर आधारित कामकाजाच्या आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता प्राधिकरणास आवशक्यता असेल तर दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल. मात्र एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

(iv) **मासिक पारिश्रमिक व भत्ते** :- सदर पदाकरिता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.17/12/2016 मधील परिशिष्ट **अ** मध्ये नमूद केल्याप्रमाणे नियुक्तिच्या दिनांकास मिळत असलेल्या महागाई भत्त्यासह निवृत्तीवेतना एवढी रक्कम मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. **आणि** एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तिच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त 3 वर्षे ) कायम राहील.

४. प्राप्त अर्जाची छाननी करुन तोंडी मुलाखतीस बोलवण्यात येईल. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करावयाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय/संकीर्ण –२७१५/ प्रक्र. १००/ १३, दि. १७.१२.२०१६ मधील अटी व शर्तीनुसार असतील.

५. सदर जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन **१५** दिवसांचे आत संबंधीतानी त्यांचे अर्ज पोस्टाने उपरोक्त पत्त्यावर पाठवावेत. स्वहस्ते सुध्दा वरील पत्यावर विहीत नमुन्यात व विहीत कालावधीत अर्ज स्विकारले जातील त्यानंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

६. सविस्तर जाहिरात मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे sceapune@gmail.com या वेबसाईटवर व राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण पुणे कार्यालयाचे नोटीस ,महाराष्ट्र राज्य , बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली आहे .

७. जाहिरातीमध्ये नमूद केलेली पदसंख्या कमी करण्याचा **अथवा** त्यापैकी कोणत्याही पदावर भरती न करण्याचा अधिकार प्राधिकरणाने राखून ठेवलेला आहे.

सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

D:\Sujata Backup 31-12-2024\D Backup\Sujata\सेवानिवृत्त कं. पदे भरती\से.कं.प.भ. 2026\सेवानिवृत्त कंत्राटी पदे भरती 2025.docx

## प्राधिकरणाच्या वेबसाईटवर व नोटीस बोर्डवर द्यावयाच्या सविस्तर जाहिरातीमध्ये द्यावयाचे अधिक अटी व शर्ती खालीलप्रमाणे

**अटी व शर्ती :-**

1. राज्य शासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध विषयांसदर्भात "विवक्षित सेवा/ कामांसाठी" विषयनिहाय **एमपँनलमेंट (Empanelment)** करुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यात येत आहेत. उदा. आस्थापना विषयक बाबी, निवडणूक कामकाज, लेखाविषयक कामकाज इ. आवश्यकतेप्रमाणे इतर विवक्षित सेवा/कामांचा यामध्ये समावेश करण्यात येईल.

**अ. निवड प्रक्रिया व नियुक्ती :-**

**नामिकासुचि (Panel) :-**

१. करारपध्दतीने नेमणूका करण्यासाठी विहीत पध्दतीने जाहिरात देऊन पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत .

२. **नामिकासुचीची (Panel) वैधता :-** सदर नामिकासुचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्षे राहील. त्या सुचीचा वार्षिक आढावा घेण्यात येईल. नामिकासूची तयार करण्यासंदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

३. सेवानिवृत्त राजपत्रित व अराजपत्रित अधिकारी व कर्मचारी यांनी दैनंदिन हजेरी नोंदविणे आवश्यक राहील.

४. सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी प्रमाणित Pension Payment Order (PPO)ची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

५. **बंधपत्र / हमीपत्र :-**करार पध्दतीने नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर नियुक्ती आदेश अनुषंगाने बंधपत्र/हमीपत्र नोटरी करून कार्यालयास सादर करावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्कांची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

६. **नियुक्ती आदेश :-** नामिकासुचीतील व्यक्तीकडुन बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशामध्ये "एम्पॅनलमेंटचा विषय" नेमून दिलेले काम/ विवक्षित स्वरुपाचे काम पुर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या 11 महिन्यासाठी किंवा 1 वर्ष कालावधीसाठी नियुक्ती देण्यात येईल.

७. **करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा :-** सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त 11 महिन्यासाठी देण्यात येईल. परंतु अशा नियुक्तीस गुणवत्ता मुल्य निर्धारण अहवाल /निकषावर आधारित कामकाजाच्या आवश्यकते नुसार वाढीव कालावधीकरीता दरवेळी नुतनीकरण करण्यात येईल. मात्र एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

८. **वयोमर्यादा :-** शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले मात्र वयाची 65 वर्ष पुर्ण न झालेले अधिकारी/कर्मचारी करार पध्दतीने नियुक्ती करण्यास पात्र असतील मात्र नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती या वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.

**ब) अर्हता व अनुभव :-**

१. विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पुर्व अट असेल.

२. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याचा दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी व तसा किमान एम.बी.बी.एस. दर्जाचे डॉक्टरचा दाखला किंवा शासकीय वैदयकीय अधिकारी यांचा दाखला आवश्यक राहील.

३.करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसे अंतिम कार्यालयाचे प्रमाणपत्र / पत्र आवश्यक राहील

क) **मासिक पारिश्रमिक व भत्ते :-**

१. **मासिक पारिश्रमिक :-** सेवानिवृत्त विहित कार्यपद्धतीचे पालन करून करार पद्धतीने नेमणूक करताना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेल्या महागाई भत्त्यासह निवृत्तीवेतनाएवढी रक्कम मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त 3 वर्षे) कायम राहील.

२.**भत्ते** :- दि.१७.१२.२०१६ शासन निर्णयामधील तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक परिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात येईल.

३. **करार पध्दतीने** नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिंच्या परिश्रमिकापोटी व भत्त्यांपोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या 010- कंत्राटी सेवा या लेखाशीर्ष/बाबी खाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात येईल.

ड ) **इतर अटी व शर्ती :-**

1. (i) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाने/ सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

(ii) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

(iii)करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

(iv)करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

(v) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

(vi)करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

२. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत. (उदा. आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकार देता येणार नाहीत.)

३. कंत्राटी तत्वावरील नियुक्ती अधिकारी/कर्मचारी यांना नैमीतिक रजे व्यतिरिक्त इतर कोणत्याही रजा अनुद्येय रहाणार नाहीत.

सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

# विहीत नमुना अर्ज

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्ज करावयाच्या पदाचे नाव : | | | | | | | |
| आडनाव | | | | | | | |
| पहिले नाव | | | | | | | |
| वडील/पतीचे नाव | | | | | | | |
| पुरूष | | स्त्री | | वैवाहिक स्थिती: | विवाहीत | | अविवाहीत |
| पत्रव्यवहाराचा पत्ता :- | | | | कायमचा पत्ता :- | | | |
| दुरध्वनी क्रमांक : | | | | भ्रमणध्वनी क्रमांक: | | | |
| ई-मेल : | | | | | | | |
| जन्म दिनांक | | | | अर्जाच्या दिनांकास असलेले वय | वर्षे : | | |
| | | | | | महिने : | | |
| प्रवर्ग : | वर्गवारी: सर्वसाधारण/ इमाव /अनु.जाती/अनु.जमाती / भ.ज.अ /ब /क /ड / विमाप्र. | | | | | | |
| आधार क्रमांक : | | | | | | | |
| पॅन क्रमांक: | | | | | | | |
| सेवानिवृत्तीचा दिनांक | | | | | | | |
| सेवानिवृत्ती PPO क्रमांक | | | | | | | |
| सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या बँकेचे नाव व शाखेचे नाव | | | | | | | |
| खाते क्रमांक | | | | | | | |

## शैक्षणिक अर्हता/संगणक व इतर अर्हता

| अर्हता | बोर्ड /विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| SSC | | | | | | |
| HSC | | | | | | |
| पदविका (असल्यास) | | | | | | |
| पदवी | | | | | | |
| पदव्युत्तर पदवी | | | | | | |
| GDC & A | | | | | | |
| MS CIT/इतर संगणक | | | | | | |
| टायपिंग | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| इतर अर्हता | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## शासकिय सेवेचा तपशिल

| अ.क्र. | पदनाम | पदावरील सेवेचा कालावधीत | सेवा कालावधीत मिळालेल्या शासकीय पारितोषकांचा तपशिल | सेवा कालावधीत कोणतीही शिस्तभंग विषयक कार्यवाही झाली असल्यास त्याचा तपशिल, नसल्यास सेवा निवृत्ती वेळेस कार्यालयाने दिलेल्या निरंक प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी. |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**सेवानिवृत्ती वेळेसचा तपशिल -**

| अ.क्र. | पदनाम | कार्यालयाचे नाव | वेतनश्रेणी | अंशराशीकरण वजा करून मंजूर झालेले मूळ सेवानिवृत्ती वेतन | मंजूर सेवानिवृत्ती वेतन | सेवा निवृत्तीच्या दिनांकास चे मूळ वेतन ग्रेड पे सह |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमूद संपूर्ण माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती असत्य/चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड/नियुक्ती कोणतीही पूर्व सुचना न देता रदद करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होउ शकते. याची मला पूर्ण जाणीव आहे.

कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरूपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणाधिकार/हक्क निर्माण होत नाही. मी नमुद केलेल्या अर्हता विषयक तपशीलाच्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास सादर करण्याची हमी मी याद्वारे देत आहे.

स्थळ :-

दिनांक:-

(उमेदवाराची स्वाक्षरी) दिनांकासहित
संपूर्ण नाव -

* वरील प्रमाणे नमूद सर्व कागदपत्रांच्या छायांकित व स्वाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक
* तसेच सेवानिवृत्तीचा PPO क्रमांक पुस्तिका सेवानिवृत्ती वेळेसच्या कार्यालयाकडील साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक